**मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४/०२/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.**

| अ.क्र. | संस्था /कार्यालय | विषय | संबंधित कार्यालय | सभेतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना,चंद्रपूर.. | चंद्रपूर येथे उद्योग भवनाचे बांधकाम करणे बाबत | कार्यकारी अभियंता एमआयडीसी, नागपूर | उद्योग भवनाचे बांधकामाबाबत कंत्राटदाराशी झालेल्या करारनाम्यानुसार बांधकाम पूर्ण करण्याची तारीख ४/७/२०११ सांगितली आहे पण उद्योग भवनाचे काम बंद असल्याचे संघटनेच्या अध्यक्षांनी सभेत सांगितले असता कार्यकारी अधिकारी, एम आय डी सी नागपूर यांनी सदर बांधकाम दिनांक २१/२/२०११ पासुन सुरु होईल असे सभेस सांगितले. त्यावर अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी , चंद्रपूर यांनी निर्देश दिले की, सदर काम दिनांक २१/२/२०११ ला सुरु झाले किंवा नाही याची माहिती जिल्हाधिकारी ,चंद्रपूर यांना सादर करावी. |
| २ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना ,चंद्रपूर. | चंद्रपूर फ्लाय ॲश क्लस्टर विकासाबाबत सद्यस्थिती | कार्यकारी अभियंता, एमआयडीसी व प्रादेशिक अधिकारी , नागपूर- | अतिरक्त चंद्रपूर औद्योगिक क्षेत्रात फ्लाय ॲश क्लस्टर करिता सुधारीत आराखडा मुख्यालय, एम आय डी सी मुंबई ला पाठविलेला असुन एमआयडीसीच्या मुख्यालयातून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर जॉईंट मेझरमेंटचे काम करण्यांत येईल असे विभागीय अधिकारी, एम आय डी सी यांनी सभेस सांगितले. त्यावर मा अध्यक्ष महोदयांनी दिनांक १४/२/२०११ पर्यंत सुधारीत आराखड्यास मंजूरी प्राप्त झाली किंवा नाही याबाबत अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. |
| ३ | जिल्हा औद्योगिक संघटना, चंद्रपूर | वेकोफिचा भूमीगत रिकाम्या खाणी मध्ये बाटम ॲशने भरण्याबाबत | मुख्य महाव्यवस्थापक वेकोफि चंद्रपूर व मुख्य महाव्यवस्थापक, सी टी पी एस चंद्रपूर | चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापूर येथे २३४० मे.वॅ. क्षमतेचे महा औष्णिक विज निर्मीती केंद्र असुन वीज निर्मीती केंद्रातून निर्माण होणारा राखेचा वापर जास्तीत जास्त कसा करता येईल या विषयावरील चर्चा दरम्यान मुख्य महाव्यवस्थापक वेस्टने काल फिल्ड, चंद्रपूर यांनी सभेत सांगितले की, एम एफ आर धनबाद चा अहवाल प्राप्त झालेला असुन २५००० क्यूबिक मि. फ्लाय ॲशने भरण्यांत येईल असे मुख्य महाव्यवस्थापक, वेस्टर्न काल फिल्ड, चंद्रपूर यांनी सभेत सांगिले त्यावर मा. अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले की, मुख्य महाव्यवस्थापक, महाऔष्णिक विज निमिती केंद्र , चंद्रपूर व महाव्यवस्थापक वेस्टर्ने काल फिल्ड, चंद्रपूर यांनी संयुक्त सभा घेवून भूमिगत कोळसा खाणी बॉटम ॲशने भरण्याबाबत योग्य तो समन्वय साधुन निर्णय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | घ्यावा व सदर विषयामध्ये झालेल्या प्रगतीवी मरहिती मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना कळवावी असे निर्देश दिलेत. |
| ४ | जिल्हा औद्योगिक संघटना, चंद्रपूर | चंद्रपूर जिल्ह्याला औद्योगिक जिल्ह्या घोषित करण्याबाबत | | सदर विषयाचा औद्योगिक संघटनेचा कुठलाही प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे सदर विषय विषयसूची वरुन वगळण्यांत यावा असे निर्देश मा. अध्यक्ष महोदयांनी दिले. |
| ५ | चांदा को-ऑप औद्योगिक सहकारी वसाहत चंद्रपूर | अ) बंगाली कॅम्प ते मच्छीनाला पर्यंत येणा-या मुख्य रस्त्या वरील डावी कडील नााल्याची रुंदी वाढविण्या बाबत<br>ब) वसाहतीतील मूलभुत सोई व सुविधाकडे विशेंष लक्ष देण्याबाबत | मुख्याधिकारी नगर परिषद, चंद्रपूर | चांदा औद्योगिक को-ऑप. वसाहत चंद्रपूर येथील मुलभूत सोयी व सुविधांच्या विषयावरील चर्चे दरम्यान नगर परिषद, चंद्रपूरच्या प्रतिनिधीने सभेस सांगितले की, मागिल वर्षामध्ये १,१२,००० रुपये कर प्राप्त झालेला आहे. त्यावर ऑक्ट्राय व येणारा खर्च हा जास्त असुन नगर परिषदेच्या तरतूदी मधून सदर काम करणे शक्य नसल्याचे उपस्थित प्रतिनिधीने सांगितले. त्यावर श्री प्रविन जानी, अध्यक्ष, चंद्रपूर औद्योगिक संघटना यांनी सदर कामे केंद्र शासनाच्या एमएसई-सीडीपी उद्योग समुह योजने अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यांत येईल असे सांगितले त्यावर मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी श्री जानी यांनी तसा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेत |
| ६ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना ,चंद्रपूर. | ताडाळी येथील विद्युत पुरवठ्याबाबत तसेच अन्य मूलभुत सुविधाबाबत | कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, चंद्रपूर आणि विभागीय कार्या. एमआयडीसी,नागपूर. | एम आय डी सी ताडाळी येथे १३२ के व्ही सबस्टेशनचे काम सुरु झाले असल्याचे कार्यकारी अभियंता, विज महावितरण कंपनी, चंद्रपूर यांनी सांगितले. त्यामुळे सदर विषय विषयसूची वरुन वगळण्यांत यावा असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेत. |
| ७ | अध्यक्ष, एम आय डी सी औद्योगिक संघटना ,चंद्रपूर.. | वरोरा एमआयडीसी मध्ये वापर करण्यात आलेल्या भूखंड धारकांच्या ताब्यात भूखंड देण्याबाबत येणारी अडचण | क्षेत्र व्यवस्थापक, एमआयडीसी, औद्योगिक संघटना | सदर विषयावर चर्चा दरम्यान मा. जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांनी विचारले की, किती उद्योग घटकांनी बांधकामाकरिता मंजूरी घेतली आहे व किती उद्योग घटकांनी नकाशा मंजूरी करीता प्रस्ताव सादर केले आहे तसेच भूखंड धारकांना भूखंड वाटपाचा किती कालावधी झाला आहे याबाबतची माहिती सादर करावी . |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | अध्यक्ष, जिल्हा औद्योगिक संघटना, चंद्रपूर | सुक्ष्म व लघु सिमेंट उद्योगांना फ्लाय ॲश मिळणेबाबत | सी टी पी एस., चंद्रपूर. | सुक्ष्म व लघु उद्योजकांना सी टी पी एस चंद्रपर येथुन राखेचा नियमित पुरवठा कसा होईल या करिता मुख्य महाव्यवस्थापक महा औष्णिक विज केंद्र चंद्रपूर व सिमेंट उद्योगाचे प्रतिनिधी यांनी सभा घेवून सुक्ष्म व लघू उद्योगांना राखेचा पूरवठा नियमित करण्यांबाबत तोडगा काढावा असे मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी निर्देश दिलेत. | |
| ९. | जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर | जिल्हा पुरस्कार योजने अंतर्गत उद्योजकांची निवड करणेबाबत. | | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर यांनी सभेत सांगितले की, जिल्हा पुरस्कार योजने अंतर्गत सन २०१० या वर्षा करिता एकूण ९ अर्ज प्राप्त झालेले आहे. तसेच जिल्हा पुरस्कार योजनेच्या तरतुदी नुसार सर्व प्राप्त अर्जाचा आढाव घेवून औद्योगिक संघटनेचे प्रतिनिधी व जिल्हा अग्रणी बॅक प्रंबंधक यांचे संयुक्त रित्या अर्जाची छाननी करन जिल्हा पुरस्काराची निवडी बाबत मा. जिल्हाधिकारी यांना माहिती सादर करावी असे ठरले. | |

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर करण्यांत आले..

सही/-
अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, तथा
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

सही/-
सदस्य सचिव तथा
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,चंद्रपूर